# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - (०२२) २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१

E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Website:www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

का.क्र. :- २अ/एडीएम/२०१७/ १६६

दिनांक 9 AUG 2017

विषय:- व्यवस्थापन शास्त्र व एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेशात विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दिनांक २२/०८/२०१७ पर्यंत मुदत वाढ देणेबाबत तसेच प्रवेशाचा कट ऑफ दि. २४/०८/२०१७ पर्यंत वाढविणेबाबत.

काही विद्यापिठांचे निकाल विशेषत: मुंबई विद्यापीठातील पदवी अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर होण्यास विलंब झाल्याने दि. १०/०८/२०१७ पर्यंत पदवी अभ्यासक्रमाच्या गुणपत्रिका पडताळणी करुन घेऊन त्या कट ऑफ दिनांक म्हणेजच १४/०८/२०१७ पर्यंत उमेदवारांनी प्रवेश घेतलेल्या संस्थेत सादर करणे शक्य होत नाही, त्या मुळे कट ऑफ दिनांकापुर्वी प्रवेश पात्रतेच्या गुणांची पुर्तता होत नसल्यास संबंधित विद्यार्थ्यांचे प्रवेश रदद होतील. हया बाबींचा सहानुभुती पूर्वक विचार करुन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा विचार करता संबंधित विद्यार्थ्यांना त्यांचे गुणपत्रक प्रवेश झालेल्या संस्थेत सादर करण्यासाठी दिनांक २२/०८/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असून प्रवेशासाठी कट ऑफ दिनांक सुध्दा १४/०८/२०१७ ऐवजी २४/०८/२०१७ पर्यंत वाढविण्यात येत आहे.

ज्या उमेदवारांना गुणपत्रिकेची मूळ प्रत दिनांक २२/०८/२०१७ पर्यंत प्राप्त होऊ शकणार नाही, त्या उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने प्राप्त होणारे गुणपत्रक ते ज्या संस्थेतून पदवी परिक्षा उत्तीर्ण झाले असतील त्या संस्थेच्या प्राचार्यांकडून प्रमाणीत करुन ती दिनांक २२/०८/२०१७ सायंकाळी ५.०० पर्यंत त्याना प्रवेश मिळालेल्या संस्थेत सादर करावे. किंवा ते विद्यापिठाच्या निकालाच्या स्टेटमेंट / रजिस्टर वरुन सुध्दा गुणांची पडताळणी केलेली प्रमाणपत्रे प्राचार्यांकडून प्रमाणित करुन दि. २२/०८/२०१७ पर्यंत प्रवेश घेतलेल्या संस्थेत सादर करु शकतील. त्यावरुन प्रवेशासाठी आवश्यक किमान गुणाची पुर्तता करणाऱ्या सबंधित उमेदवाराचा प्रवेश ग्राहय धरण्यात येईल, अन्यथा तो दिनांक २२/०८/२०१७ रोजी वेळ ५.०० वाजेनंतर रदद करुन व ती जागा रिक्त झाल्याचे समजून प्रवेशाच्या अंतीम दिनांकापर्यंत अन्य नोंदणी झालेल्या पात्र उमेदवारांमधून संस्था स्तरावर भरण्याची संस्थेला मुभा असेल, याची संबंधित उमेदवार आणि संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी.

(दयानंद मेश्राम)
सहसंचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

प्रत:- १. आयुक्त, राज्य समायिक प्रवेश परीक्षा, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पू), मुंबई — ४०० ००५. यांना माहितीस्तव.

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपूर यांना सदर बाब सर्व संबंधितांचे निदर्शनास आणावी

३. आयटी सेल, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई. संकेत स्थळावर प्रसिध्द करुन अनुषंगिक कार्यवाही करावी.

\\192.168.1.9\minister_ppt\desk 2a\परिपत्रक - 2017.docx